मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# समाविष्ट भागाला लवकरच स्वच्छ पाणीपुरवठा

## आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा; जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या भागांना लवकरच स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा होणार आहे. यासाठी आंद्रा धरण येथून अधिक प्रवाहाने पाणी सोडण्याचे तसेच इंद्रायणी नदी पात्रातील निघोजे बंधारा तातडीने स्वच्छ करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत



पिंपरी-चिंचवड शहराला मावळ परिसरातील पवना धरण आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. आंद्रा धरणातून सोडण्यात येणारे पाणी निघोजे बंधाऱ्यामार्गे इंद्रायणी नदीतून उचलून चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून समाविष्ट भागातील नागरिकांना वितरित केले जाते.

मात्र मोशी, चिखली, चऱ्होली, चोविसावाडी, डुडुळगाव आणि बोऱ्हाडेवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून दुर्गंधीयुक्त व अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्याची बाब आमदार महेश लांडगे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केली. दूषित पाण्यामुळे नागरिक त्रस्त असल्याचे त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले.

यासंदर्भात आमदार लांडगे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन संपूर्ण परिस्थिती मांडली. त्यानंतर मंत्र्यांनी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून सूचना देत, आंद्रा धरणातून अधिक प्रवाहाने पाणी सोडण्याचे व निघोजे बंधारा त्वरित स्वच्छ करण्याचे आदेश दिले.

तसेच या विषयावर तालिका अध्यक्ष समाधान अवताडे यांनीही शासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

> “आंद्रा धरणातून अधिक प्रवाहाने इंद्रायणी नदीत पाणी सोडले जाईल. निघोजे बंधारा जलसंपदा विभागाकडून तातडीने स्वच्छ करण्यात येईल. त्यामुळे समाविष्ट भागातील नागरिकांना स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा होईल. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी राज्य शासन आणि महापालिका कटिबद्ध आहेत. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे शहराच्या वतीने आभार मानतो.”.
>
> - महेश लांडगे, भोसरी विधानसभा आमदार, भारतीय जनता पार्टी

# पवित्र पोर्टलच्या धर्तीवर प्राध्यापक आणि प्राचार्य भरती प्रक्रिया राबवा : आमदार शंकर जगताप

## धोरणात्मक निर्णय घेणार असल्याची उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा; भरती प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी सरकारचे नवीन पाऊल

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य पदभरतीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकार आता 'पवित्र पोर्टल'च्या धर्तीवर नवीन भरती प्रणाली राबविण्याबाबत धोरणात्मक विचार करत आहे असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान सांगितले. चिंचवड विधानसभा मतदार संघाचे आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी (दि. २७) विधानसभेत उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नावर (क्रमांक २७३२५)..उत्तर देताना सभागृहात घोषणा केली.

आमदार शंकर जगताप यांनी राज्यातील २०८८ प्राध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेत पात्र उमेदवारांना डावलून आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या एकूण २७ तक्रारी उच्च शिक्षण संचालनालयाकडे (डीएचई) प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींमध्ये संस्थाचालक, विद्यापीठ निवड समिती आणि शासन प्रतिनिधी यांच्या संगनमताने ठराविक उमेदवारांची नियुक्ती केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असल्याबाबत आमदार जगताप यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. ह्याबाबत श्री. चंद्रकांत पाटील सांगितले की,"तक्रारी प्राप्त झाल्याची बाब खरी आहे. महाराष्ट्र नव प्राध्यापक संघटनेने केलेल्या मागणीनुसार, सर्व तक्रारींच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश २० जानेवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण संचालकांना देण्यात आले आहेत."



> "उच्च शिक्षण क्षेत्रातील रिक्त जागा भरताना पारदर्शकता असणे अत्यंत गरजेचे आहे. २०८८ प्राध्यापक भरती प्रक्रियेत पात्र आणि गुणवंत उमेदवारांवर अन्याय झाल्याच्या तक्रारी गंभीर आहेत. जर संस्थाचालक आणि अधिकारी यांच्या संगनमताने गुणवत्ता डावलली जात असेल, तर ते राज्याच्या शैक्षणिक भवितव्यासाठी घातक आहे. म्हणूनच, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी लावून धरली आहे. भविष्यात असा गैरप्रकार टाळण्यासाठी ही भरती प्रक्रिया 'पवित्र पोर्टल'च्या धर्तीवर राबविण्याची घोषणा आज सभागृहात करण्यात आली आहे.
>
> - शंकर जगताप. आमदार, पिंपरी चिंचवड

### भरती प्रक्रियेमध्ये मानवी हस्तक्षेप कमी होणार

» राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक आणि प्राचार्य पदभरतीमध्ये शासनाने या प्रकरणातील चौकशीचा अहवाल मागवला असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळणाऱ्यांवर कडक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, भरती प्रक्रिया अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जाणार आहे. भरतीमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींसोबत ठोस पुरावा सादर करण्यात आलेला नाही, असे श्री. चंद्रकांत दादा पाटील नमूद केले. मात्र, उमेदवारांमधील अविश्वास दूर करण्यासाठी आणि भविष्यात होणाऱ्या भरतीमध्ये मानवी हस्तक्षेप कमी करण्यासाठी 'पवित्र पोर्टल' सारखी ऑनलाइन आणि मध्यवर्ती प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत शासन सकारात्मक आहे.

तसेच श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी यावेळी सांगितले की, प्राध्यापक पदांची निवड प्रक्रिया ही ८ सदस्यांच्या "इंटरव्यू पॅनल"च्या माध्यमातून केली जाते. ज्यामध्ये विद्यापीठ आणि संस्थेचे असे एकूण ८ सदस्य असतात. तसेच संचालक व सहसंचालक यांच्या निवड प्रक्रिये दरम्यान केवळ "ना हरकत" देण्याइतका संबंध असतो. तरीदेखील भविष्यात निवड प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता यावी. यासाठी शाळांमध्ये शिकवणाऱ्या शिक्षकांसारखीच वेगळी भरती प्रक्रिया राबवण्यात येईल. यासाठी "पवित्र पोर्टल"च्या धर्तीवर प्राध्यापक आणि प्राचार्य भरती प्रक्रिया राबवू असे अधिवेशना दरम्यान त्यांनी सांगितले. यामुळे राज्यातील हजारो प्राचार्य आणि प्राध्यापकांना दिलासा मिळाला आहे.

# वापरात नसलेल्या वस्तू जवळच्या आर.आर.आर.केंद्रात जमा करा

## स्वच्छ, हरित शहरासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रत्येक घरात वेळोवेळी साफसफाई करताना जुनी खेळणी, कपडे, भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फर्निचर अशा अनेक वस्तू बाहेर टाकल्या जातात. या वस्तू रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकल्याने शहराचे सौंदर्य बाधित होते आणि कचऱ्याचे प्रमाण वाढते. मात्र, या वस्तू योग्य पद्धतीने संकलित करून गरजूंपर्यंत पोहोचवल्यास त्यांचा पुनर्वापर होऊन समाजालाही मदत होते. सामाजिक बांधिलकी जपत पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील विविध प्रभाग स्तरावर आर.आर.आर. (रिड्यूस, रियुज, रिसायकल) केंद्रे सुरू केली आहेत. तरी नागरिकांनी घरातील वापरात नसलेल्या पण सुस्थितीत असलेल्या वस्तू आर.आर.आर. केंद्रात जमा कराव्यात, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आणि सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागाकडून शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत विविध ठिकाणी आर.आर.आर. केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये नागरिकांनी घरातील न वापरता ठेवलेल्या पण चांगल्या स्थितीतील वस्तू जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जमा झालेल्या वस्तूंचा गरजूंपर्यंत पुनर्वितरण केले जाते. त्यामुळे शहर स्वच्छ राहते, कचऱ्याचे प्रमाण घटते आणि समाजात पुनर्वापराची जाणीव वाढते.

या उपक्रमामुळे वापरात नसलेल्या वस्तूंचा योग्य पुनर्वापर आणि पुनर्निर्मितीद्वारे पर्यावरणावर होणारा ताणही घटतो. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधला जात आहे.




### या ठिकाणी आहेत आर.आर.आर केंद्र

» "अ" क्षेत्रीय कार्यालय : कापसे उद्यान, मोरवाडी (प्र. १०), आकुर्डी भाजी मंडई (प्र. १४), संत तुकाराम महाराज गार्डन (प्र. १५), श्रीधरनगर गार्डन (प्र. १९)

» "ब" क्षेत्रीय कार्यालय : एसकेएफ कंपनी शेजारी, थेरगाव (प्र. १७), हेगडेवार पूल, दर्शननगरी (प्र. १८), धर्मराज चौक, रावेत (प्र. १६), ज्योतिबा उद्यान, काळेवाडी (प्र. २२)

» "क" क्षेत्रीय कार्यालय : हेगडेवार क्रीडा संकुल, अजमेरा (प्र. ९), धावडे वस्ती, भोसरी (प्र. ६), संत सावता महाराज उद्यान, मोशी (प्र. २), संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, पिंपळे गुरव (प्र. ८)

» "ड" क्षेत्रीय कार्यालय :लिनियर गार्डन, कोकणे चौक (प्र. २८), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान, पिंपळे निलख (प्र. २६), तानाजी कलाटे उद्यान, वाकड (प्र. २५), प्रभाग कार्यालय क्र. २९

» "इ" क्षेत्रीय कार्यालय : मोशी चौक (प्र. ३), दिघी जकात नाका (प्र. ४), राजमाता जिजाऊ उड्डाण पूल, भोसरी (प्र. ५, ७)

» "फ" क्षेत्रीय कार्यालय : वृंदावन, चिखली (प्र. १), भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (प्र. ११), रूपीनगर पोलिस चौकी (प्र. १२), शनि मंदिर, सेक्टर २१ (प्र. १३)

» "ग" क्षेत्रीय कार्यालय : थेरगाव हॉस्पिटल शेजारी, जगताप नगर (प्र. २३), मोरू बारणे उद्यान, थेरगाव (प्र. २४), पिंपरीगाव बसस्टॉप (प्र. २१), आरोग्य कोठी, रहाटणी गावठाण (प्र. २७)

» "ह" क्षेत्रीय कार्यालय : छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर (प्र. २०), सितांगण गार्डन (प्र. ३०), कै. काळुराम जगताप तलाव (प्र. ३१), जुनी सांगवी भाजी मंडई (प्र. ३२).

### आर.आर.आर केंद्रात या वस्तू जमा करू शकता

» पुस्तके, वह्या, शालेय साहित्य, चांगल्या स्थितीतील कपडे, चादरी, पडदे, खेळणी, शैक्षणिक साधने, घरगुती साहित्य, भांडी, फर्निचर, छोटे-मोठे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चपला तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या इतर वस्तू..

> स्वच्छ आणि हरित शहर घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. घरातील वापरात नसलेल्या वस्तू आर.आर.आर. केंद्रात जमा करून नागरिकांनी पर्यावरण संवर्धना सोबतच गरजू बांधवांना मदतीचा हात द्यावा. महापालिकेकडून राबविण्यात येणारा आर.आर.आर केंद्र हा उपक्रम सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ करणारा आहे
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणारा आर.आर.आर. केंद्र हा उपक्रम स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांना जोडणारा आहे. नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन महापालिकेस सर्वतोपरी सहकार्य करावे.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल उपायुक्त, आरोग्य विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# आळंदी-मोशी बीआरटी रस्त्यावरील ड्रेनेजची समस्या

## नगरसेविका सारिका गायकवाड यांची रात्री पाहणी; दुसऱ्याच दिवशी दुरुस्ती पूर्ण करून नागरिकांना दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदी-मोशी बीआरटी मार्गावरील हवालदार वस्ती आणि तपोवन भूमी समोरील ड्रेनेज लाईन खराब झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. या ड्रेनेजमधून रात्रीच्या वेळी सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने पादचाऱ्यांचे व वाहनधारकांचे प्रचंड हाल होत होते. विशेष म्हणजे, या उघड्या ड्रेनेजमध्ये एक व्यक्ती पडल्याची धक्कादायक घटनाही घडली होती. या गंभीर समस्येबाबत दयानंद पाटील, रोहन सस्ते पाटील, मयूर सस्ते व स्थानिक नागरिकांनी तक्रार केल्यानंतर, आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका सौ. सारिका ताई रवी भाऊ गायकवाड यांनी तातडीने दखल घेत ही समस्या सोडवली आहे.

सदर समस्येचे गांभीर्य ओळखून, दिवसभर इतर कामात व्यस्त असूनही नगरसेविका सारिका गायकवाड यांनी रात्री उशिरा प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. ड्रेनेजची अवस्था अत्यंत बिकट असल्याचे लक्षात आल्यानंतर, त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळीच महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण केले. स्वतः उपस्थित राहून त्यांनी ड्रेनेज दुरुस्तीचे काम पूर्ण करून घेतले. या कामामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निः श्वास सोडला असून प्रलंबित प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. याकामी माजी महापौर नितीन काळजे, नगरसेविका सारिका गायकवाड, नगरसेवक सचिन भाऊ तापकीर, नगरसेविका अर्चनाताई सस्ते पाटील यांचेही सहकार्य लाभले. आम्ही सर्व लोकप्रतिनिधी आमदार महेश दादा लांडगे यांच्या नेतृत्वाखाली जनतेची सेवा करण्यासाठी सदैव कटिबद्ध आहोत. अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



> "नागरिकांची सुरक्षा आणि आरोग्य ही आमची प्राथमिकता आहे. ड्रेनेज खराब असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता आणि अपघाताची भीतीही निर्माण झाली होती. ही तक्रार समजताच आम्ही तातडीने कार्यवाही केली. रात्री उशिरा पाहणी केल्यानंतर सकाळीच अधिकाऱ्यांकडून हे काम करून घेतले आहे. प्रभागातील कोणत्याही नागरी समस्या सोडवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत."
>
> - सारिका गायकवाड, नगरसेविका

# दिलासादायक निर्णय; सक्षमीकरण योजना महापालिकेकडून थेट राबविणार

## 15 क्षेत्रीय कार्यालयांतून प्रभावी अंमलबजावणी; अधिक पारदर्शकता आणि महिलांना थेट लाभ

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना ठेकेदारांच्या माध्यमातून न राबविता महापालिकेने स्वतःच राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेच्या निविदा दोन बांधकाम ठेकेदारांना मिळाल्या होत्या. मात्र, यावरून स्थायी समितीच्या बैठकीत वाद झाल्याने आता ही योजना महापालिका प्रशासन पंधरा क्षेत्रीय कार्यालय स्तरावर स्वतः राबविणार आहे.

महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत प्रत्येक प्रभागासाठी १० लाख रुपये खर्च करून ही योजना राबविण्यात येणार असून, १५ क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्रत्येकी ३० लाखांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. या योजनेसाठी केवळ तीन ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी एक अपात्र ठरल्याने दोनच ठेकेदारांमध्ये सुमारे ४ कोटी रुपयांची कामे विभागून देण्यात आली. विशेष म्हणजे दोन्हीही कंपन्या बांधकाम क्षेत्रातील होत्या. बांधकाम कंपन्यांना ही कामे मिळाल्याने स्थायी समितीच्या बैठकीत यावरून मतभेद झाले. त्यामुळे आता ठेकेदारांऐवजी महापालिका क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ही योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत ४१ प्रभागामध्ये १६५ जागांवर निवडणूक झाली. यामध्ये सर्वाधिक जागा म्हणजे ११९ जागा मिळवित भाजप महापालिकेत पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे. तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस मिळून ३० जागांवर विजय मिळविता आला आहे. शिवसेना ( ठाकरे) पक्षाचा एक आणि काँग्रेस पक्षाचे १५ नगरसेवक निवडून आले आहेत. भाजपचे सर्वात जास्त नगरसेवक विजयी झाल्याने महापालिकेच्या प्रत्येक समितीमध्ये भाजपचे वर्चस्व राहणार असल्याचे निश्चित आहे. स्थायी समितीमध्ये देखील १६ पैकी १० सभासद भाजपचे आहेत

राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना २०१६ मध्ये तत्कालीन स्थायी समिती अध्यक्षा आश्विनी कदम यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत प्रत्येक प्रभागात महिलांसाठी शिक्षण, प्रशिक्षण, क्षमता बांधणी, आरोग्य शिबिरे, तपासण्या आदी उपक्रम राबविले जातात. करोना संकटानंतर २०२० पासून ही योजना बंद ठेवण्यात आली होती. प्रशासक काळात ती पूर्णपणे स्थगित होती. यंदा पुन्हा योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




### स्थायी समितीत वाद

» पुणे महानगरपालिकाच्या पहिल्याच स्थायी समिती बैठकीत राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजनेवरून वाद निर्माण झाला. १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी प्रत्येकी ३० लाखांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. केवळ दोन बांधकाम कंपन्यांना सुमारे ४ कोटी रुपयांची कामे देण्यात आल्याने सदस्यांनी आक्षेप घेतला. महिला सक्षमीकरणाची योजना बांधकाम कंपन्यांमार्फत का राबवली जाते, असा सवाल उपस्थित करण्यात आला. त्यामुळे विषयावर सविस्तर चर्चा होऊन अखेर ठेकेदार पद्धतीऐवजी पर्यायी तोडगा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

### प्रशासनाचा नवा निर्णय

» वादानंतर ही योजना ठेकेदारांऐवजी महापालिका प्रशासनामार्फतच राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक प्रभागासाठी १० लाख रुपये खर्च करण्यात येणार असून १५ क्षेत्रीय कार्यालय स्तरावर थेट अंमलबजावणी होईल. ८ ते १४ मार्चदरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे खर्चावर नियंत्रण राहील आणि योजना उद्दिष्टांनुसार प्रभावीपणे राबविता येईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### योजनेची पार्श्वभूमी

» राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना २०१६ मध्ये सुरू करण्यात आली होती. शिक्षण, प्रशिक्षण, क्षमता बांधणी, आरोग्य शिबिरे आणि तपासण्या असे विविध उपक्रम या अंतर्गत घेतले जातात. कोरोना काळात २०२० पासून योजना स्थगित होती. प्रशासक काळातही ती राबविण्यात आली नाही. यंदा पुन्हा योजना सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने महिलांमध्ये सकारात्मक अपेक्षा निर्माण झाली आहे. आता ती अधिक पारदर्शक व परिणामकारक पद्धतीने राबवली जाणार आहे.

# होळीसाठी वृक्षतोड केल्यास एक लाखांचा दंड; महापालिकेचा कडक इशारा

## विनापरवाना झाडे तोडणे गुन्हा; पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात होळीसाठी झाडांच्या फांद्या तोडण्याचे प्रकार होऊ नयेत, यासाठी पुणे महापालिका प्रशासन सतर्क झाले आहे. विनापरवाना झाडे तोडणे, जाळणे किंवा झाडांना कोणत्याही प्रकारे इजा करणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 2021 नुसार परवानगीशिवाय वृक्षतोड केल्यास संबंधित झाडाच्या मूल्याइतका दंड आकारला जाऊ शकतो. हा दंड एक लाख रुपयांपर्यंत असू शकतो. त्यामुळे होळीच्या निमित्ताने वृक्षतोड करू नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. विनापरवाना वृक्षतोड किंवा झाडांना हानी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारींसाठी 18001030222 हा टोल-फ्री क्रमांक, 9689900002 हा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक तसेच संकेतस्थळाचा उपयोग करता येणार आहे.

शहरात काही ठिकाणी होळीसाठी झाडांच्या फांद्या कापणे किंवा झाडांची छाटणी करण्याचे प्रकार घडतात. मात्र, अशा कृतींमुळे पर्यावरणाची हानी होत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल होऊ शकतो, असे महापालिकेने नमूद केले आहे. वृक्ष प्राधिकरणाकडून यासंदर्भात लक्ष ठेवले जाणार असून, तक्रार आल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे. विनापरवाना झाडे तोडणे, जाळणे किंवा झाडांना कोणत्याही प्रकारे इजा करणे हा कायद्याने गुन्हा असून, अशा प्रकारांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.



### ...येथे करा तक्रार

» विनापरवाना वृक्षतोड किंवा झाडांना हानी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारींसाठी 18001030222 हा टोल-फ्री क्रमांक, 9689900002 हा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक तसेच संकेतस्थळाचा उपयोग करता येणार आहे.

"पर्यावरणपूरक पद्धतीने होळी सण साजरा करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा आणि शहरातील झाडांचे संरक्षण करावे."

- अशोक घोरपडे, उद्यान विभागप्रमुख

# बालेवाडी-वाकड परिसरातील कोंडी सुटणार ! न्यायालयाने आदेश

## मुळा नदीवरील बालेवाडी-वाकड पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी भूसंपादन करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

मुळा नदीवरील बालेवाडी-वाकड पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी आवश्यक असलेले भूसंपादन तातडीने करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. यापूर्वी या जमीनीवर दिलेली स्थगिती उठवून न्यायालयाने २०१३ च्या भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायद्यानुसार एक वर्षामध्ये आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यास सांगितले आहे. त्यामुळे या पुलाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम गतीने होणार आहे.

या पुलाकडे जाण्यासाठी आवश्यक असलेला रस्ता अंकुश बालवडकर यांच्या मालकीचा आहे. त्यांनी नुकसानभरपाई आणि स्थगितीच्या मागणीसाठी न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. ८ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयाने भूसंपादनावर स्थगिती दिली होती. मात्र, याचिकाकर्ते अभिजीत गरड व संदीप मंडलोई यांच्या वतीने ॲड. सत्या मुळे यांनी हस्तक्षेप अर्ज दाखल करून जनहित याचिकेतील पूर्वीच्या आदेशांची माहिती न्यायालयास दिली.

मुळा-मुठा नदीवरील पूल बांधूनही तो नागरिकांच्या वापरासाठी खुला नसणे ही गंभीर बाब आहे. पुलाकडे जाणारा पोहोच रस्ता तातडीने बांधणे अत्यावश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.यापूर्वी ९ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशातही संबंधित अधिकाऱ्यांनी प्रस्तावावर त्वरित निर्णय घेऊन जमीन ताब्यात घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. महानगरपालिकेनेदेखील आवश्यक भरपाईची रक्कम भूसंपादन अधिकाऱ्यांकडे जमा करण्यास तयारी दर्शविली आहे.



### याचिका आणि स्थगितीचा प्रवास

» रस्त्यासाठी लागणारी जमीन खासगी मालकीची असल्याने संबंधित जमीनमालकाने नुकसानभरपाई आणि स्थगितीच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. डिसेंबर २०२५ मध्ये न्यायालयाने भूसंपादनावर स्थगिती दिली होती. त्यानंतर जनहिताच्या दृष्टीने हस्तक्षेप अर्ज दाखल करून पुलाचे महत्त्व न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यामुळे रखडलेली प्रक्रिया पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला.

बालेवाडी, बाणेर व वाकड परिसरात झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडी तीव्र झाली आहे. सध्या नागरिकांना मुंबई-बंगळुरू महामार्ग किंवा विशालनगर मार्गे वळसा घालून प्रवास करावा लागत असून ५ ते ६ किलोमीटर अतिरिक्त अंतर आणि ४० मिनिटांहून अधिक वेळ खर्च होतो. पूल सुरू झाल्यास वाहतूक कोंडी कमी होऊन वेळ व इंधनाची मोठी बचत होईल, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला. त्यावर यापूर्वी दिलेली स्थगिती उठवीत न्यायालयाने एका वर्षामध्ये आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश महापालिकेला दिले आहेत.

अधिक माहिती देताना सत्या मुळे म्हणाले, बालेवाडी-वाकड पुलाकडे जाणाऱ्या पुलाचे काम गेल्या काही वर्षापासून सुरू आहे. या भागात पूल उभारण्यात आला आहे. मात्र या पुलाकडे जाण्यासाठी आवश्यक असलेला रस्ता नाही. यासाठी जागेची आवश्यकता आहे. ही जागा खासगी जागा मालकाची असल्याने ही जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होते. जागा देण्यास नकार देत संबंधित जागा मालकाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने त्यासाठी स्थगिती दिली होती. त्यामुळे काहीच प्रगती होत नव्हती. न्यायालयाच्या निदर्शनास ही बाब आणून देत हा रस्ता होणे किती आवश्यक आहे, हे पटवून दिल्याने कामातील अडथळा दूर झाला आहे.

### न्यायालयाचा स्पष्ट आदेश

» मुळा नदीवरील बालेवाडी–वाकड पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी आवश्यक भूसंपादन एका वर्षात पूर्ण करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. यापूर्वी देण्यात आलेली स्थगिती उठवत न्यायालयाने २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार कार्यवाही करण्यास सांगितले. पूल उभारूनही तो वापरासाठी खुला नसणे ही गंभीर बाब असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे प्रशासनाने तातडीने जमीन ताब्यात घेऊन रस्त्याचे काम पूर्ण करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### नागरिकांना मोठा दिलासा

» बालेवाडी, बाणेर आणि वाकड परिसरात वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडी तीव्र झाली आहे. सध्या नागरिकांना ५ ते ६ किलोमीटर अतिरिक्त वळसा घालावा लागतो आणि सुमारे ४० मिनिटे जादा वेळ खर्च करावा लागतो. पुलाकडे जाणारा रस्ता पूर्ण झाल्यास प्रवासाचा वेळ कमी होईल, इंधनाची बचत होईल आणि वाहतूक कोंडीही मोठ्या प्रमाणात घटेल. न्यायालयाच्या आदेशामुळे नागरिकांना लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


# बिल्डरांचे धाबे दणाणले! 146 कोटींच्या वसुलीसाठी जिल्हाधिकाऱ्यांचा हातोडा

## जिल्हा प्रशासनाचा ॲक्शन मोड; दोन महिन्यांत वसुली पूर्ण करण्याचे प्रांताधिकारी व तहसीलदारांना आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

सदनिकांचा वेळेत ताबा न देणे, प्रकल्पास विलंब लावणे, बांधकाम सुरू न करणे आदींमुळे सदनिका घेतलेल्या ग्राहकांनी अशा विकसकांविरुद्ध महारेराकडे दाद मागितली होती. यावर महारेराने अशी रक्कम वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना दिले होते. त्यानुसार बांधकाम व्यावसायिक आणि विकासक यांच्याविरुद्ध महारेराने दिलेल्या आदेशानुसार,

कारवाई करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील १८६ प्रकरणांमध्ये १४६ कोटी रुपये येत्या दोन महिन्यांत वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना दिले आहेत. महारेरा पुणे आणि मुंबई यांच्या आदेशानुसार मार्च २०२५ पर्यंतची २४६ प्रकरणे होती.



त्यांची वसुलीची रक्कम १९५ कोटी रुपये होती. त्यानंतर जानेवारी २०२६ पर्यंत ५९ प्रकरणांत नवीन आदेश होऊन आणखी ५३ कोटी रुपये वसूल करण्यास महारेराने सांगितले. या प्रकरणांपैकी ११८ प्रकरणांमध्ये गेल्या दहा महिन्यांत वसुली करण्यात आली. गेल्या दहा महिन्यांत प्रशासनाने ११८ प्रकरणांमध्ये १०२ कोटी रुपये वसूल केले आहेत.

आता १८६ प्रकरणे प्रलंबित असून दि.२० एप्रिलपर्यंत त्यांच्यावर कारवाई करण्याची सूचना दिली आहे. रक्कम न मिळाल्यास सदनिकांचा लिलाव करून ही रक्कम वसूल करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. यातील अनेक प्रकरणे ही जुनी आहेत. त्याबाबत नोटिसा देण्यात आल्या, मात्र कारवाई झाली नाही.

### १८६ प्रकरणांत १४६ कोटींची वसुली मोहीम

» महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटीच्या आदेशानुसार पुणे जिल्ह्यातील १८६ प्रकरणांत सुमारे १४६ कोटी रुपये वसूल करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोहीम हाती घेतली आहे. सदनिकांचा ताबा न देणे व प्रकल्प रखडविल्याने ग्राहकांनी तक्रारी दाखल केल्या होत्या. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रांताधिकारी व तहसीलदारांना दोन महिन्यांत कारवाई पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. रक्कम न भरल्यास संबंधित सदनिकांचा लिलाव करून वसुली करण्यात येणार आहे. हवेली, पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील प्रकरणांची संख्या सर्वाधिक आहे. ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.